# ‘महिला धोरणात स्वच्छतागृहांचा गांभीर्याने विचार करा’

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई



राज्यातील एकूण महिलांची लोकसंख्या लक्षात घेता स्वच्छतागृहांची सुविधा अपुरी असून याप्रकरणी राज्य सरकारने योग्य ती दखल घ्यावी, अशी मागणी राज्याच्या महिला आयोगाच्या अध्यक्ष

## रूपाली चाकणकर यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

रूपाली चाकणकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. राज्य सरकारने सन २०१४मध्ये जाहीर केलेल्या महिला धोरणात निर्णय होऊनही त्याची अंमलबजावणी झाल्याचे दिसत नाही. याबाबत संबंधितांना योग्य त्या उपाययोजना राबविण्याची सूचना द्याव्यात, अशी मागणी त्यांनी पत्राद्वारे केली.

‘सध्या राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनकाळात विधानभवनाबाहेर असणाऱ्या महिलांसाठी स्वच्छतागृह नाही. स्वच्छ भारत अभियानांतर्गत उभारलेली स्वच्छतागृहे लोकसंख्येच्या मानाने अपुरी आहेत. महामार्गावर पेट्रोल पंप, फूड मॉल येथे स्वच्छ आणि मोफत स्वच्छतागृहे नाहीत. अधिवेशनकाळात विधिमंडळ आवारात असणाऱ्या महिला पोलिसांसाठीही स्वच्छतागृहाची सुविधा नाही. २०१४च्या महिला धोरणातील स्वच्छतागृहांच्या सुविधांची अंमलबजावणी झाली नाही,’ असे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

‘स्वच्छ भारत अभियानाच्या आकडेवारीनुसार, राज्यात एक लाख ६० हजार स्वच्छतागृहे आहेत. यामध्ये एक लाख कम्युनिटी टॉयलेट, तर जवळपास ६० हजार सार्वजनिक स्वच्छतागृहे आहेत. पालिकेची महिलांसाठी ५,१३६ स्वच्छतागृहे आहेत. सन २०२०च्या आकडेवारीनुसार, राज्यात २२ लाख कुटुंबे, मुंबईमध्ये ११ लाख लोकसंख्येची २३ टक्के कुटुंबे सार्वजनिक स्वच्छतागृहांचा वापर करतात. महामार्गांवरील पेट्रोल पंप, फूड मॉल येथे मोफत स्वच्छतागृहे नाहीत,’ याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

महाराष्ट्र टाईम्स
१८ मार्च 2023